J.B.S.P.Mandal's

# Mahila Mahavidyalaya, Georai Ta.Georai Dist.Beed

## Academic Year: 2019-2020

### Annual Report on Celebrations of NSS Events

The college believes in celebrating events and festivals in college. It is an integral part of learning and building a strong cultural belief in a student. The College makes tremendous efforts in celebrating the national and international days, events and festivals throughout the year.

In academic year 2019-20, we celebrated the following days

## LIST OF THE ACTIVITIES 2019-2020

| Sr. No. | Event Name | Date Page |
|---|---|---|
| 1. | Environment Day/ ***Tree Plantation*** | 26/07/2019 |
| 2. | Tilak Death anniversary &Birth anniversary of Annabhau Sathe | 01/08/2019 |
| 3. | NSS Day | 24/09/2019 |
| 4. | Constitution Day | 26/09/2019 |
| 5. | AIDS Awareness Day | 01/12/2019 |
| 6 | Women Health Awareness Programme | 11/12/2019 |
| 7 | Birth anniversary Savitribai Phule | 03/01/2020 |
| 8 | Birth anniversary of Sant Gadgemaharaj | 23/02/2020 |
| 9 | International Women's Day | 08/03/2020 |

| | |
|---|---|
| **Nature of Activity** | **Tree Plantation** |
| Date | **26/07/2019** |
| Venue | Collage Campus |
| Faculty | B.A. |
| Name of Chief Guest | ------ |
| Organizer | ***Dr. Gharge K.H. & Dr. Sawant K.D.*** |
| Participants | 06 |
| Topic | **Tree Plantation** |







झुंजारनेता

दिनांक : २८ जुलै २०१९ वार : रविवार पान ५

बीड-महाराष्ट्र

महत्वाचे...

**पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महिला महाविद्यालयात वृक्षारोपण**

गेवराई ,दि. २७(प्रतिनिधी):- येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या महिला महाविद्यालयात दि. २७ शनिवार रोजी पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कांचन परळीकर यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने हा वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात येऊन लिंब, चिंच, सिसम, गुलमोहर आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. कैलास सावंत व प्रा. डॉ. कल्पना घारगे यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

2023.07.21 14:16

Report of the Progrramme

On World Environment Day, a tree plantation program was held in Women's College Planting trees for environmental conservation and balance is becoming the need of the day Considering the rise in global temperature and natural irregularities, it is becoming the need of the hour for every person to plant trees and tree conservation. Principal professors and students were present in the college

| Nature of Activity | Lokmanya Tilak’s Death anniversary &Birth anniversary of Annabhau Sate |
|---|---|
| **Date** | 01/08/2019 |
| **Venue** | Seminar Hall |
| **Faculty** | B.A. |
| **Name of Chief Guest** | ***Dr Rasker B.R.*** |
| **Organizer** | *Dr. Sawant K.D. & Dr. Gharge K.H* |
| **Participants** | 19 |
| **Topic** | Lokmanya Tilak’s Death anniversary &Birth anniversary of Annabhau Sate |









लोकप्रश्न

शनिवार, दि.३ ऑगस्ट २०१९

## महिला महाविद्यालयात साठे जयंती व टिळक पुण्यतिथी साजरी

**गेवराई । वार्ताहर**

वर्गात शेंगा खाऊन त्याची टरफलं मी टाकली नाहीत, त्यामुळे मी शिक्षा सहन करणार नाही, असे बाणेदार उत्तर देणारे लोकमान्य टिळक आपल्याला या शेंगांच्या गोष्टी पलिकडे फारसे माहितच नसतात. तथापि ही ‘टरफलं’ कोणी टाकली? हे सुध्दा बाल टिळकांनी शिक्षकाला सांगितले नाही. ‘टरफलं’ टाकून अस्वच्छता करणाऱ्याचा शोध आता तरुणांनाच घ्यावा लागणार आहे, असे मार्मिक प्रतिपादन महिला महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. भिष्मा रासकर यांनी केले.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील महिला महाविद्यालयात लोकशाहिर अण्णाभाऊ साठे [illegible] लोकमान्य टिळकांचा स्मृतीदिन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रा. डॉ. [illegible] रासकर बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कांचन परळीकर होत्या, तसेच प्रा. नामदेव शिनगारे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन आणि साहित्यावर बोलतांना प्रा. नामदेव शिनगारे यांनी अण्णाभाऊंच्या वेदनादायी आयुष्याचा आणि प्रेरणादायी साहित्याचा आढावा घेतला. अण्णाभाऊंच्या ‘स्मशानातलं सोनं’ या कथेची मिमांसा करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कल्पना घारगे यांनी कार्यक्रमाच्या प्रारंभी आपल्या प्रास्तविकपर भाषणात थोरांच्या जयंत्या आणि स्मृतीदिन साज–या करण्यामागील हेतू स्पष्ट केला. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांनी लोकमान्य टिळक यांचा राजकीय लढा आणि अण्णाभाऊ साठे यांचा सामाजिक लढा विषद केला. या दोन्ही महात्म्यांनी देशासाठी केलेल्या कार्याचे मोल अनन्यसाधारण असल्याचेही डॉ. परळीकर म्हणाल्या.

**Report**

**The death anniversary of Lokmanya Tilak, whom we know as the father of Indian discontent, and the birth anniversary of Annabhau Sathe were celebrated in the college. On the occasion of the birth anniversary of Annabhau Sathe, who spent his life on education and social awareness, the National Service Scheme Department of the college felicitated him on his birth anniversary. The Principal of the college, Dr. Kanchan Parlikar, the program officer of the National Service Scheme, Dr. Kalpana Gharge, Dr. Kailas Sawant worked hard.**

| | |
|---|---|
| **Nature of Activity** | ***N.S.S. Day*** |
| **Date** | 24/09/2019 |
| **Venue** | Seminar Hall |
| **Faculty** | B.A. |
| **Name of Chief Guest** | ***Dr.Sangita Aher*** |
| **Organizer** | ***Dr.Gharge K.H. / Dr.Sawant K.P.*** |
| **Participants** | 29 |
| **Topic** | ***N.S.S. Day*** |







कार्यारंभ

Wednesday 2019/09/25

# रासेयो ही एकात्मता आणि मूल्यांची चळवळ-डॉ.आहेर

## महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

**बीड दि.२४ : राष्ट्रीय सेवा** योजनेव्दारे युवा पिढीला समाजभान आणि नेतृत्वाचा आत्मविश्वास मिळत असून राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रीय एकात्मता आणि मानवी मूल्ये रुजविणारी चळवळ असल्याचे प्रतिपादन गेवराईच्या महिला महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. संगीता आहेर यांनी केले.

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथिल महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने मंगळवारी (दि.२४) राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून प्रा. डॉ. संगीता आहेर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कांचन परळीकर या होत्या. याप्रसंगी बोलतांना प्राचार्या डॉ. कांचन परळीकर यांनी देशाचे गढूळ झालेले सामाजिक वातावरण अधोरेखित करीत सहृदयी भावना जोपासण्याचे आवाहन केले. इतरांवर प्रेम करण्यासाठी अगोदर स्वतःवर प्रेम करायला शिका असे सांगून प्राचार्या डॉ. कांचन परळीकर म्हणाल्या की, स्वप्रेमातूनच समाजप्रेम आणि पर्यायी राष्ट्र प्रेम वाढीस लागते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कल्पना घारगे यांनी प्रास्तविक केले. सदर कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थिनी स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नामदेव शिनगारे यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजने चे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कैलास सावंत यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना समितीसह प्रा.डॉ.संतोषकुमार यशवंतकर, उपप्राचार्य प्रा. राजाभाऊ चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.

Like Comment



चंपावतीपत्र

वार - शुक्रवार दि. २७-०९-२०१९ २

# रासेयो ही एकात्मता आणि मूल्यांची चळवळ- डॉ. संगीता आहेर

गेवराई । वार्ताहार

राष्ट्रीय सेवा योजनेव्दारे युवा पिढीला समाजभान आणि नेतृत्वाचा आत्मविश्वास मिळत असून राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रीय एकात्मता आणि मानवी मूल्ये रुजविणारी चळवळ असल्याचे प्रतिपादन गेवराईच्या महिला महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या प्रमुख प्रा. डा. संगीता आहेर यांनी केले.जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथिल महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने २४ संप्टेबंर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख वक्ता म्हणून प्रा. डा संगीता आहेर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डा कांचन परळीकर या होत्या. याप्रसंगी बोलतांना प्राचार्या डा कांचन परळीकर यांनी देशाचे गढूळ झालेले सामाजिक वातावरण अधोरेखित करीत सहृदयी भावना जोपासण्याचे अवाहन केले. इतरांनवर प्रेम करण्यासाठी अगोदर स्वतःवर प्रेम करायला शिका असे सांगून प्राचार्या डा कांचन परळीकर म्हणाल्या की, स्वप्रेमातूनच समाजप्रेम आणि पर्यायी राष्ट्र प्रेम वाढीस लागते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी आणि राष्ट्र संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डा कल्पना घारगे यांनी प्रास्तविक केले. सदर कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ विभागाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थिनी स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नामदेव शिनगारे यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजने चे कार्यक्रमाधिकारी प्रा. डा कैलास सावंत यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना समितीसह प्रा. डा संतोषकुमार यशवंतकर, उपप्राचार्य प्रा, राजाभाऊ चव्हाण आदीनी परिश्रम घेतले.

2023.07.21 14:24

Report

The National Service Scheme Day was celebrated on behalf of the National Service Scheme Department of Women's College, Gevrai. September 24 is celebrated as the National Service Scheme Day throughout India. In this program, the task of developing the attitude towards society among the students is done. In this program, as the chief guest, Professor Dr. Sangeeta Aher, Head of the Department of Hindi, expressed the view that the National Service Scheme is a movement of national integration and values. The program was attended by a large number of college principals, program officers and students. Self-love leads to social love and alternative love of the nation. At the beginning of the program, a large number of faculty, staff and students of the senior and junior departments participated in the program by paying floral tributes to the images of Mahatma Gandhi and RashtrasantGadgebaba by dignitaries.

| | |
|---|---|
| **Nature of Activity** | Constitution Day |
| **Date** | 26/09/2019 |
| **Venue** | Seminar Hall |
| **Faculty** | B.A. |
| **Name of Chief Guest** | *Prof. Hira Kharat* |
| **Organizer** | ***Dr.Gharge K.H. / Dr.Sawant K.P./choudhari K P*** |
| **Participants** | 38 |
| **Topic** | Constitution Day |











# ंविधानामुळे भारतीय समाज एकसंध राहिला आहे-डॉ.कांचन परळीकर

## हिला महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजर

तिनिधी । गेवराई

स्वातंत्र्य, समता, बंधूभाव याय या राज्यघटनेने दिलेल्या मुळे विविधतेने नटलेला समाज एकसंध राहिला आहे. पादन प्राचार्या डॉ. कांचन यांनी केले.

वानी शिक्षण प्रसारक गेवराई येथील महिला ालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना ा वतीने दि. २६ नोव्हेंबर विधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्राचार्या डॉ. कांचन परळीकर अध्यक्षस्थानावरुन बोलत होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागाचे प्रा. नामदेव शिनगारे हे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते 'भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येऊन उपस्थितांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. प्रा. नामदेव शिनगारे यांनी भारतीय संविधानातील नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि जबाबदाऱ्यांवर विवेचन करुन महाविद्यालयाच्या ग्रंथालयास संविधानाची प्रत भेट दिली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कल्पना घागे आणि कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कैलास सावंत तथा स्वयंसेविकांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कु. मनिषा गव्हाणे हिने तर आभार प्रदर्शन कु. कोमल आरबड हिने केले. तर यावेळी प्रा. मोहन परजने यांच्या मातोश्रींचे दुःखद निधन झाल्याबद्दल महिला महाविद्यालयाच्या वतीने त भावपूर्ण श्रद्धांजली अ करण्यात आली.



पार्श्वभूमी
शुक्रवार २९ नोव्हेंबर २०१९ P. 5

# महिला महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात



गेवराई, दि. २८ (प्रतिनिधी) – स्वातंत्र्य, समता, बंधूभाव आणि न्याय या राज्यघटनेने दिलेल्या चतु:सूत्रींमुळे विविधतेने नटलेला भारतीय समाज एकसंघ राहिला, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कांचन परळीकर यांनी केले.

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्राचार्या डॉ. कांचन परळीकर अध्यक्षस्थानावरुन बोलत होत्या. प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागाचे प्रा. नामदेव शिनगारे हे उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते 'भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येऊन उपस्थितांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. प्रा. नामदेव शिनगारे यांनी भारतीय संविधानातील नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि जबाबदाऱ्यांवर विवेचन करुन महाविद्यालयाच्या ग्रंथालयास संविधानाची प्रत भेट दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राध्यापक–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कल्पना घारगे आणि कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कैलास सावंत तथा स्वयंसेविकांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मनिषा गव्हाणे हिने तर आभार प्रदर्शन कोमल आरबड हिने केले.

**परजनेआईंना श्रध्दांजली**

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळातील प्रा. मोहन परजने यांच्या मातोश्रींचे दु:खद निधन झाल्याबद्दल महिला महाविद्यालयाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी सर्व प्राध्यापक–विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Report

Indian Constitution Day program was organized on behalf of National Service Scheme Department and Public Administration Department in Women's College. Indian Constitution paved the way for people of all castes and religions in all societies and with the aim of making the college students aware of the Constitution Day program was organized. Na Parlikar expressed that in this program the Program Officer of National Service Scheme Department Professor Dr. Kalpana Gharge Dr. Kailas Sawant Professor Shingare Sir Professor Hira Kharat and many female students were present.

Indian Constitution Day program was organized on behalf of National Service Scheme Department and Public Administration Department in Women's College. Indian Constitution paved the way for people of all castes and religions in all societies and with the aim of making the college students aware of the Constitution Day program was organized. Na Parlikar expressed that in this program the Program Officer of National Service Scheme Department Professor Dr. Kalpana Gharge Dr. Kailas Sawant Professor Shingare Sir Professor Hira Kharat and many female students were present.

| | |
|---|---|
| **Nature of Activity** | AIDS Awareness Day |
| **Date** | **01/12/2019** |
| **Venue** | Seminar Hall |
| **Faculty** | B.A. |
| **Name of Chief Guest** | ***Dr.JaishreeHivrekar*** |
| **Organizer** | *Dr. Sawant K.D. & Dr Inmdar T.M.* |
| **Participants** | 21 |
| **Topic** | AIDS Awareness Day |













EXPERIMENT : No.

Page No. 11
Date 14 12 2019

कार्यारंभ

६

शनिवार दि.१४ डिसेंबर २०१९

# एचआयव्ही एड्सबद्दल जनजागरण काळाची गरज-राजश्री हीवरेकर

## एचआयव्ही पंधरवाड्यानिमित्त महिला महाविद्यालयात व्याख्यान व रांगोळी स्पर्धा

प्रतिनिधी । गेवराई

एच.आय.व्ही.चे जनजागरण ही ळाची गरज आहे. युवा पिढिने स्वतःची स्वतः घ्यावी, युवक हा देशाचा आहे. तो सुरक्षीत, निरोगी असेल रोगी असणार आहे. एड्सला असेल तर त्याबाबत तरुणांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होणं गरज असल्याचे प्रतिपादन राजश्री यांनी केले.

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा विभाग व उपजिल्हा आरोग्य विभागाच्या वतिने एचआयव्ही पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम रा.से.यो.स्वयंसेविकेने काढलेल्या रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कांचन परळीकर होत्या तर प्रमुख पाहुणे गेवराई येथिल उपजिल्हा आरोग्य विभागाच्या हीवरेकर व तिडके सर होते. प्राचार्या डॉ. कांचन परळीकर यांनी आरोग्य विषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. प्रास्तविक हिंदी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. संगीता आहेर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्पना यारगे यांनी केले तर आभारप्रदर्शन रा. से. यो. स्वयंसेविका मनिषा गव्हाणे हिने केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने करण्यात आली.

Report

Aids awareness program was organized on behalf of Mahila College Gevrai December 1 is celebrated as AIDS Awareness Day. On this occasion, for the students of the college, with the cooperation of Taluka Health AIDS Awareness Officer and staff, H. i. V. As awareness about AIDS is the need of the hour, various programs were organized in the college. In this, competitions were organized in the college to raise public awareness about AIDS through lectures by Rajshree Hiverekar of college students and Rangoli competition from an artistic point of view. Also, on this occasion, CBC test of girls was conducted in Attal College and contestants of various colleges took part in the program and worked to create awareness about AIDS Awareness at that place.

| | |
|---|---|
| **Nature of Activity** | Birth anniversary of Savitribai Phule |
| **Date** | 03/01/2020 |
| **Venue** | Seminar Hall |
| **Faculty** | B.A. |
| **Name of Chief Guest** | *Prof. Hira Kharat* |
| **Organizer** | *Dr. Sawant K.D. & Dr Inmdar T.M.* |
| **Participants** | 24 |
| **Topic** | Birth anniversary of Savitribai Phule |







EXPERIMENT : No.

Page No. 12
Date 5 1 2020

दिवसाचा शुभारंभ...

# कार्यारंभ

● संपादक : शिवाजी सोनाजीराव रांजवण पाटील ● किंमत ३ रुपये

● रविवार, दि.५ जानेवारी २०२० ५

## सावित्रीमाई फुले यांच्यामुळे महिलांना मानसन्मान मिळाला-प्रा.हिरा खरात

प्रतिनिधी । गेवराई

दि. ४ : जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतिने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कांचन परळीकर ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे प्रा. हीरा खरात ह्या होत्या. कार्यक्रमाची सुरूवात क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली.

यावेळी बोलतांना प्रा. हीरा खरात म्हणाल्या की, जी माणसं इतिहास विसरतात ते कधिच इतिहास घडवू शकत नाहित. शिक मुली शिक, लिहायला वाचायला शिक. कोणी आडव आल तर त्याला तुडवायला शिक असे सांगत सावित्रीमाई फुले यांच्यामुळेच महिलांच्या जगण्याला सन्मान मिळाला असल्याचे त्या म्हणाल्या. तर अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. कांचन परळीकर म्हणाल्या की, स्वताःला स्वतःच अस्तित्व कसं उभं करायच हे शिकले म्हणजे खऱ्या अर्थाने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी केल्या सारखं आहे. सावित्रीमाई फुले यांना फक्त मानू नका तर त्या आचरणात आणा असे त्या म्हणाल्या. तत्पुर्वी शिंगाडे सूरेखा, भंडारी माया, मुंडे आंकाक्षा, वरकड आरती, ढवारे सोनिया, सुर्यवंशी सिध्दी, शेख हुमेरा, व राठोड शितल या विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक माया भंडारीने तर सूत्रसंचालन मनिषा गव्हार्णेनी केले व आभार कोमल आरबड हीने मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्र गीताने करण्यात आली.

Report

The birth anniversary of Kranti Jyoti Savitribai Phule was celebrated with great enthusiasm on behalf of the National Service Scheme Department of Women’s College of Jai Bhavani ShikshanPrasarak Mandal.

Prof. Kharat convinced the girls about the importance of education in the words of learn children, learn to write, learn to write, learn to trample if anyone comes in the way. Majority of the students were present in the program.

| **Nature of Activity** | Women Health Awareness Programme |
|---|---|
| Date | 11/12/2019 |
| Venue | Seminar Hall |
| Faculty | B.A. |
| Name of  Chief Guest | ***Dr.*** Rajshree Hiverekar. |
| Organizer | Dr.Sangita Aher |
| Participants | 26 |
| Topic | Women Health Awareness Programme |






# Report

On December 11, 2019, a lecture on "Women's Health" was organized by the Internal Women's Grievance Redressal Committee. Mrs. Rajshree Hiverekar of Health Center at Gevrai was present as the chief guest. He gave detailed guidance to the students on the topic that girls should take care of their health. After this, the students asked some questions and their doubts were cleared. The president of the program, Dr. Kanchan Parlikar, the principal of the college, during the presiding conclusion asserted that the students should be aware of their health so that they can avoid infectious and other diseases and get good health. Dr. Sangeeta Aher introduced the program while Prof. Dr. Kalpana Gharge moderated and thanks Ms. Siddhi Suryavanshi believed. The program was attended by a large number of female students.

| | |
|---|---|
| ***Nature of Activity*** | Birth anniversary of Sant Gadgemaharaj |
| *Date* | *23/02/2020* |
| *Venue* | *Seminar Hall* |
| *Faculty* | *B.A.* |
| *Name of Chief Guest* | ***Prof.Shingare N.s.*** |
| *Organizer* | *Dr. Gharge K.H.&Dr.Sawat K.d.* |
| *Participants* | *19* |
| *Topic* | Birth anniversary of Sant Gadgemaharaj |









| | |
|---|---|
| ***Nature of Activity*** | *International Women's Day* |
| *Date* | *08/03/2020* |
| *Venue* | *Seminar Hall* |
| *Faculty* | *B.A.* |
| *Name of Chief Guest* | ***Prof. Bapu Ghokshe*** |
| *Organizer* | *Dr. Sangita Aher* |
| *Participants* | *19* |
| *Topic* | *International Women's Day* |






# 'पुरुष' कधीही 'आई' सारखा कोमल होऊ शकत नाही –प्रा.बापू घोक्षे

## महिला महाविद्यालयात जागतिक महिलादिन साजरा

प्रतिनिधी । गेवराई

दि. ८ : सगळे महापुरुष स्त्रीमुळेच घडले आहेत. कुणाची प्रेरणा आई होती, कुणाची पत्नी, कुणाची बहिण, कुणाची मुलगी तर कुणाची प्रेरणा मैत्रीण होती. शेक्सपीअरची 'ब्लक लेडी' त्याला प्रेरित करीत राहिली. तथापि, आईसारखं कोमल आणि संवेदनशील होणे पुरूषाला कदापि शक्य नसते, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी–नाटककार प्रा. बापू घोक्षे यांनी केले. जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रा. बापू घोक्षे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कांचन परळीकर या होत्या. यावेळी प्रा. डॉ. कल्पना घारगे, इंग्रजी विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. तबस्सुम इनामदार आणि प्रा. नामदेव शिनगारे हे उपस्थित होते.




पुढे बोलतांना प्रा. बापू घोक्षे म्हणाले की, राजमाता जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, मातोश्री रमाई आंबेडकर, संत मदर टेरेसा, इंदिरा गांधी, कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, पी. टी. उषा आणि इतरही अनेक कर्तृत्ववान महिलांनी या देशाचा नावलौकिक वाढविला आहे. मूळातच महिलांमध्ये निसर्गतः काही गुण पुरूषांपेक्षा जास्तच असून सृजनाचा आणि नवनिर्मितीचा अधिकार निसर्गाने स्त्रियांना दिला आहे. संविधानाने स्त्री व पुरुष यांना समान अधिकार दिले असले तरी भारताच्या कर्मठ - पुरूषी संस्कृतीने स्त्रीला 'दास्यत्व' लादले होते. गुलामी आणि पारंपरिक शोषणाच्याविरुध्द स्त्री कायम लढत आली आहे. पुरूषांनी तिच्यासोबत उभे राहून हा शोषणविरोधी लढा कायम लढणे गरजेचे आहे. केवळ व्याख्याने आणि भाषणे करून पुरेसे परिवर्तन घडणार नाही. त्यासाठी जाणिव जागृतीसोबतच प्रत्यक्ष कृती कार्यक्रमही राबवले पाहिजेत. शिक्षित स्त्रीच्या सोबतीने अशिक्षित आणि ग्रामिण स्त्रीला मुख्य प्रवाहात आणण्याची जबाबदारी या आधुनिक समाजाची असल्याचेही प्रा. बापू घोक्षे यांनी ठामपणे सांगितले.

महिला महाविद्यालयाच्या विशाखा समितीच्या वतीने हा जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी, कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. कांचन परळीकर म्हणाल्या की, स्त्री समानता तेव्हाच येईल जेव्हा पुरुषांच्या मानसिकतेत बदल होईल. स्त्री व पुरुष एकाच रथाची दोन चाके आहेत. ती समान असतील तर जीवनाचा व संसाराचा गाडा व्यवस्थित चालेल. प्रा. डॉ. संगीता आहेर यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी कु. सिध्दी सूर्यवंशी हिने केले तर आभार मनिषा गव्हाणे हिने केले. याप्रसंगी, प्राध्यापक-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.